शै.का.मु.-४०,००० पु. (२५ x ३)-०८-२०१०-ए ३-वि (वाय) ३५६

FORM - 1A

N.C.R.B. I.I.F. 06

## पहिली खबर

## FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये (Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State: महाराष्ट्र  जिल्हा District: मुंबई  पोलीस ठाणे Police Station: लाप्रवि  पहिली खबर क्र. FIR No.: १८/१८  वर्ष Year: २०१८  दिनांक Date: २५/०४/१८

2. (i) अधिनियम Act: लाप्रवि १९८८  कलमे Sections: ७, १३(१)(ड) सह १३(२)

(ii) अधिनियम Act ........ कलमे Sections ........

(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........

3. (a) अपराधाची घटना : वार Occurence of offence : Day ........ तारीख पासून Date from: २३/०४/१८  वेळ Time ........ तारीख पर्यंत Date to: २४/०४/१८  वेळ Time ........

3. वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी अशी खूण करा. Tick applicable portion)
(1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
(6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (10) 18.00 ते 06.00

(b) पो. ठा. ला माहिती मिळालेची Information received at P. S. तारीख Date: २४/०४/१८  वेळ Time ........

(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No.: ०५/१८  तारीख Date: २५/०४/१८  वेळ Time: ०७.००

4. माहितीचा प्रकार Type of information : लेखी / तोंडी Written / Oral: लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Place of Occurence : (a) Direction and distance from P.S.: बी. वॉर्ड, मनपा डोंगरी, मुंबई  चौकी/बीट/दूरक्षेत्र नाव व क्र. Chouki/Beat/O.P. Name and No. ........

(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurence Name: बी वॉर्ड, मनपा  ठिकाणाचे नंबर No. if any ........ गल्ली Ward: बाबुला टँक  रस्त्याचे नाव Name of road: रामचंद्र भट्ट मार्ग

जवळचे ओळख चिन्ह/ठिकाण Nearest Adentifiable Place: जे.जे.हॉस्पीटल  गाव Village: —  पोस्ट Post: —  तालुका Taluka: —  जिल्हा Dist.: मुंबई  राज्य State: महाराष्ट्र

(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station: —  तालुका Taluka: —  जिल्हा Dist.: —  राज्य State: —

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant/Informant : Permanent Address

(a) नाव Name: श्रीमती फरीदा हसीन  (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husbands Name: अहमद कुरेशी

(c) जन्मतारीख व वय Date of Birth & Age: ४३ वर्षे  (d) राष्ट्रीयत्व Nationality: भारतीय  फोन नं. Phone No.: ७८७७५३८३९५९

(e) पारपत्र क्रमांक Passport No.: —  दिल्याचा दिनांक Date of Issue: —  दिल्याचे ठिकाण Place of Issue: —  (f) व्यवसाय Occupation: नोकरी

(g) धर्म Religion: मुस्लीम  जात Caste: —  जनजात Sub-Caste: —

(h) पत्ता : गल्ली/सर्व्हे नं. Address : Ward: २८५  घर/नाव नंबर House/Name No.: [illegible] बिल्डींग  फोन/मो. नंबर Phone/M. No.: ८८२३८७८७०२०  पॅन नं. Pan No.: —  ओटर्स नं. Card No.: —

रस्त्याचे नाव Road: रामचंद्र भट्ट मार्ग  जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place: जे.जे. हॉस्पीटल  गाव Village: —  पोस्ट Post: —  पो.स्टे P. Stn.: —

तालुका Taluka: —  जिल्हा Dist.: मुंबई  राज्य State: महाराष्ट्र  सध्याचा पत्ता Present Address: वरील प्रमाणे

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म I B वर वेगळ्या सिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व स. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे).
Details Name & Address of known Accused (Attach separate sheet, if necessary) (If suspect particular of physical feature write on Form I-B of attach FIR I-B to case diary).

श्री शैलेशकुमार महादेव कांबळी, वय ५० वर्षे
पत्ता :- ३५/१३४६ बीएमसी कॉलनी, विभाग क्र. ६, साने गुरुजी वसाहत,
मालवणी, मालाड (प), मुंबई ९५, साईबाबा मंदीर जवळ,

श्रीमती फरीदा हसीन अहमद कुरेशी, वय - ४२ वर्षे. रा. डी - १४५, प्रिन्सेस बिल्डींग, 'बी' ब्लॉक, १ ला मजला, फ्लॅट नं १०, रामचंद्र भट्ट मार्ग, जे.जे हॉस्पीटल समोर, मुंबई ०८ यांचा जबाब स्वतंत्र कागदावर नोंदविण्यात आला असून तोच गुन्ह्याची पहिली खबर म्हणुन संबोधण्यात येत आहे.

Qureshi
२४/०४/२०18

समक्ष

(दिलीप पाडवी)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

**जबाब** दिनांक २४/०४/२०१८

मी, फरिदा हसीन अहमद कुरेशी, वय/४३, व्यवसाय –नोकरी (शिक्षिका) रा.ठि. १२५ प्रिन्सेस बिल्डींग, बी ब्लॉक १ ला माळा, सदनिका क्र.१०, रामचंद्र भट्ट मार्ग, जे जे हॉस्पीटल समोर, मुंबई ४०० ००९

मी, वरील प्रमाणे असुन वर नमुद पत्त्यावर माझे परिवारासंह रहाते. मी मीरा भाईंदर महानगर पालीका शाळेमध्ये शिक्षीका म्हणून नोकरीस आहे.

मी माझी सदनीका क्र.२, १८०/१८२, प्रकाश भवन, सॅम्युअल स्ट्रिट, मस्जिद बंदर, मुंबई ०२ ही जागा प्रशांत मांझी यांना सोन्याच्या दागीन्याचे काम करण्यासाठी भाडयाने दिली आहे. दिनांक १६/०४/२०१८ रोजी सकाळी १०.१० वा. मनपाचे कनिष्ठ अभियंता. श्री. प्रमोदकुमार सुर्वे यांनी माझ्या वरील सदनिके मध्ये चालत असलेल्या सोन्याच्या दागिन्याच्या कामाची तपासणी केली. तपासणी नंतर तपासणी रिपोर्ट मला दिला. त्यामध्ये मी एक अनोळखी व्यक्ती नसीम अहमद कुरेशी अनधिकृत पणे सोन्याच्या दागिन्याचे काम करतो व त्यासाठी दोन एचपीची मशिन चालवतो कारखान्यात पाच सोन्याचे काम करणारे कामगार आहेत. व हे सर्व कारखाना विभागाकडुन परवाना न घेता अनधिकृतपणे करतो म्हणुन प्रशांत मांझी यांची स्वाक्षरी घेवून त्याचा तपासणी रिर्पोट त्यास दिला. श्री प्रशांत मांझी यांनी सदर रिर्पोट माझे पतीस दिल्यामुळे मला त्याबाबत माहिती मिळाली.

दिनांक २१/०४/२०१८ रोजी मनपा 'बी' वॉर्ड विधी विभागातील सुचना लीपीक शैलेशकुमार कांबळी यांनी माझ्या मोबाईलवर फोन करून आमच्या वरील सदनिकेमधील दिलेला तपासणी रिपोर्ट व न्यायालयीन कारवाई बाबत माहिती दिली. आणि केस बाबत तडजोड करायची असेल तर तपासणी रिपोर्ट मधील एका व्यक्ती करीता रू. ३०,०००/– आणि वरून त्याच्यासाठी रू. २०००/– अशी लाचेची मागणी केली. व मला भेटण्यास बोलवले. माझी लाच देण्याची इच्छा नसल्याने मी त्या संबंधाने दिनांक २३/०४/२०१८ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे स्व:हस्ताक्षरात तक्रार अर्ज दिला आहे.

दिनांक २३/०४/२०१८ रोजी सदरची तक्रार पो.नि. पाडवी यांचेकडे केली. पो.नि. पाडवी यांनी माझा व त्यांचा आपसी परिचय करून दिला व मला सापळा कारवाईबाबत सविस्तर माहिती दिली. पो.नि. पाडवी यांनी दोन पंचाना बोलावुन घेतले. व माझा व त्यांचा परिचय करून दिला व मी दिलेल्या तक्रार अर्ज त्यांना वाचण्यास दिला व त्यांवर त्यांची स्वाक्षरी घेतली. त्यांनंतर पो.नि. पाडवी यांनी स्वाक्षरी केली. त्या नंतर पो.नि. पाडवी यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर आणला व त्यां संबधी माहिती देवुन त्यांमध्ये माझे व लोकसेवक यांचेतील बोलणी ध्वनी मुद्रीत करण्यासाठी सदरचा रेकॉर्डर वापरणार असल्याचे सांगितले. तसेच सोबत पंच सुध्दा येणार असल्याचे सागितले व घ्यावयाच्या योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर माझे व पंचाचे संभाषण नमुद रेकॉर्डर मध्ये ध्वनी मुद्रीत केले. त्यांनंतर पो.नि. पाडवी यांनी सापळा पथकातील अधिकारी सपोआ. ठोंबरे व कर्मचारी यांची ओळख करून दिली.

त्यांनतर सुमारे १६.३० वा. सुमारास पो.नि. पाडवी, सपोआ. ठोंबरे व कर्मचारी शासकीय वाहनातुन लोकसेवक यांची भेट घेण्यासाठी निघालो. जे.जे. समुह रूग्नालय , डोंगरी, मुंबई येथील आवारात सदरचे वाहन थांबवले. व सदरचा रेकॉर्डर चालु केला व तो माझे कुरत्याला आतील बाजुस मपोशि सावंत यांनी लावला. मी व माझे सोबत पंच क्र. ०१ श्री. मिराशी असे दोघे 'बी' वार्ड मनपा कार्यालय, बाबुला टॅक, डोगरी येथे दुसऱ्या मजल्यावर लिगल विभाग येथे गेलो व श्री. कांबळी यांना भेटले असता त्यांनी सांगितले

की, केस बाबत तडजोड करायची असेल तर तपासणी रिपोर्ट मधील एका व्यक्ती करीता रू. ३०,०००/— आणि वरून त्याच्यासाठी रू. २०००/— असे पैसे दयावे लागतील त्यानंतर मी त्यांना उदया दिनांक २४/४/२०१८ रोजी पैसे घेवून येते असे सांगितले. तेव्हा कांबळी यांनी सांगितले की तुम्ही वर न येता खाली कॅन्टीन जवळ या व मला फोन करा मग मी येवुन तुम्हाला भेटतो. त्यानंतर मी तेथुन निघुन पोलीस वाहनाजवळ आले. सदर ठिकाणी आल्यानंतर रेकॉर्डर बंद करून मला विचारले. तसेच पंचानाही हकीकत विचारली. व त्यांनतर पो.नि. पाडवी यांनी रेकॉर्डर चालु करून झालेले संभाषण ऐकले नंतर आंम्ही सर्व लाप्रवि कार्यालयात आलो व तेथे सविस्तर पंचनामा व ट्रान्सस्क्रिप्ट तयार करण्यात आले. व मला दिनांक २४/०४/२०१८ रोजी लाप्रवि कार्यालय येथे येण्यास सांगितले. त्यानंतर पोनि पाडवी यांना मी विनंती केल्यावरून सायंकाळी १६.०० ते १७.०० चे सुमारास जे जे रूग्णालय आवार येथे थेट येवून थांबण्यास सांगितले.

त्यानंतर मी दिनांक २४/०४/२०१८ रोजी सदरचे पैसे घेवुन मी जे.जे.रूग्नालय आवार येथे सायंकाळी १७.०० वा. सुमारास हजर झाले व रू. ३२,०००/— तेथे हजर असलेले पोलीस निरीक्षक श्री. पाडवी यांना दिले. त्यानंतर पाडवी साहेब यांनी अॅन्थ्रासीन पावडर दाखवून त्याचे गुणधर्म समजावून सांगितले. व एका कर्मचाऱ्याला सदरची पावडर नोटांना लावण्यास सांगितले. व मला योग्य त्या सूचना देवून सदरची रक्कम खाकी लिफाफा मध्ये ठेवली व लिफाप्याला सुध्दा पावडर लावली. व सदरचा लिफापा माझ्या हॅन्ड पर्समध्ये ठेवला. व लोकसेवक यांना लाचेची रक्कम दिल्यानंतर डोक्यावरील चष्मा काढून तो डोळयावर लावण्याचा इशारा करण्यास सांगितले. त्यानंतर डीजीटल रेकॉर्डर मध्ये माझे व पंचांचे संभाषण ध्वनीमुद्रीत केले. व सदरचा रेकॉर्डर चालू करून माझे कुरत्याच्या आतील बाजूस लावण्यास दिला. त्यानंतर मला व पंचाना लोकसेवक यांची भेट घेण्यासाठी पाठविले. व सापळा पथकातील काही कर्मचारी हे माझे पूर्वीच बी वॉर्ड येथील कॅन्टींगचे आसपास थांबण्यासाठी पाठविण्यात आले होते. व काही कर्मचारी माझे मागून आले. मी बी वॉर्ड कार्यालयाचे गेटवर आले असता कांबळी भेटले नंतर आंम्ही तेथील कॅन्टींगमध्ये गेल्यानंतर आंम्ही एकमेका समोरील खुर्च्यांवर बसलो. व बाजुच्या लाईनला असलेल्या टेबलच्या खुर्चीवर पंच बसले. त्यानंतर माझे व कांबळी यांचे बोलणी झाली त्यांनी पैश्याची मागणी केली असता, मी पर्समधून लाचेची रक्कम असलेला लिफापा काढून उजव्या हाताने त्यांच्या उजव्या हातात दिला. व त्यांना सदरची रक्कम मोजून घेण्यास सांगितली परंतू त्यांनी न मोजता डाव्या हाताने पॅन्टच्या डाव्या बाजुच्या पुढील खिशात ठेवला. त्यानंतर मी ठरल्याप्रमाणे इशारा केला असता, पोलीसांनी लागलीच घेराव घालून लोकसेवक कांबळी यांना पंचासमक्ष रंगेहात ताब्यात घेतले.

तरी मनपा, बी वॉर्ड, कार्यालय, बाबुला टॅक, डोंगरी, मुंबई येथील सूचना लिपीक श्री शैलेशकुमार कांबळी यांनी मला न्यायालयीन कारवाई मधून सुटका करण्यासाठी तडजोड करण्याकरीता रू. ३२०००/— मागणी करून रू. ३२,०००/— हजराची लाचेची रक्कम स्विकारण्याचे कबुल करून लाचेची रक्कम स्विकारली म्हणुन माझी त्यांचे विरूध्द कायदेशीर तक्रार आहे.

समक्ष,

(signature)

(दिलीप पाडवी)
पोलीस निरिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

(signature) 24/04/18
(फरिदा कुरेशी)

तक्रारदाराने/फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ——— ना/०५/१८
Records for delay in reporting by the Complainant/informant

9. चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तार मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proform) write down details on blank back page.

—

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य —
Total value of properties stolen and involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recover Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक —
Unnatural/Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.
First Information brief contents (Attach separate sheet, i' required) : Detail write down back blank page.

यातील नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील नमुद आरोपी लोकसेवक यांनी यातील फिर्यादी यांचे सदनिकेस मनपा अधिनीयमान्वये दिलेल्या तपासणी रिपोर्ट संदर्भात न्यायालयात केसमध्ये तपासणी रिपोर्ट मधील फिर्यादी यांचे केसचे तडजोडी करीता फिर्यादी यांचेकडे रु. ३०,०००/- व स्वत: करीता रु २०००/- असे मिळुन एकुण ३२,००० इतक्या रक्कमेची पदाचा गैरवापर करुन कायदेशीर पारिश्रमाखेरीज लाचेची मागणी करुन दि. २४/४/१८ रोजी सापळा कारवाई दरम्यान फिर्यादी यांचेकडुन रु. ३२,०००/- लाचेची रक्कम स्विकारली म्हणुन गुन्हा कलम ७,१३(१)(ड) सह १३(२) भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनीयम १९८८ अन्वये गुन्हा नोंद

13. केलेली कार्यवाही .— 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला. तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा पो. नि. दिलीप बा. पाडवी

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण.

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन — जिल्हा — राज्य —

*Action taken* .— Since the above information reveals Commission of offence (s) u/s. as mentioned at Item No. 2 :

(1) Registered case and took up the investigation or Directed (Name of I. O.) .............. Rank .................. No. ............... to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ............................................ (3) Transferred to P. S. ............................... District ............................................ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून/वाचून/ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant/Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/informant, free of cost.

(R.O.A.C.)

[signature] 24/04/2018

[signature]

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer Incharge, Police Station.
संपूर्ण नाव Name दिलीप बाजक्या पाडवी
पदनाम Rank पोलीस निरीक्षक
तपासिक अं. चा कोड क्र. लाप्रवि, मुंबई.
Posting
Coding No. of I. O. ...............................

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression
of the Complainant/Informant

15. १. न्यायालयास सादर केल्याची तारीख २५/०४/१८
1. Date and time of submitted to the Court

[signature] 29/04/18

प्रत. 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.
Copy to, 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.